# लग्नाच्या जेवणाचा दृष्टांत

येशू परत त्यांच्याशी दृष्टांतात बोलायला लागला. स्वर्गाचे राज्य त्या राज्यासारखे आहे ज्याने आपल्या पुत्राचे लग्न केले. आणी त्याने आपल्या दासाला असे सांगून पाठवले कि, निमंत्रीत लोकांना लग्नाच्या जेवणाला बोलवा, परंतु ते येत नव्हते. नंतर त्याने दासांना हे सांगून पाठवले, ' निमंत्रीत लोकांना सांगा: पाहा, मी जेवण तयार केले आहे, माझे बैल आणी पाळलेले पशु मारले गेले आहे, आणि सर्वकाही तयार आहे; लग्नाच्या जेवणाला या.'

परंतु ते मनावर न घेता निघून गेले कोणी आपल्या शेतात, कोणी आपल्या व्यापाऱ्याला. दुसऱ्या लोकांमध्ये जे उरले होते त्यांच्या दासांना पकडून त्यांना अनादर केले आणी मारून टाकले. तेव्हा राजाला राग आला, आणी त्यांनी आपली सेना पाठवून हत्यारांना मारून टाकले, आणी त्यांच्या नगराला जाळून टाकले.

तेव्हां तो त्याच्या दासांना म्हणाला, "लग्नाचे जेवण तयार आहे परंतु निमंत्रीत लोक योग्य नाही ठरले. याच्या साठी चवाठ्या वर जा आणी जेवढे लोक तुम्हाला मिळेल, तेवढ्यांना लग्नाच्या जेवणाला बोलावून आणा. मग त्या दासांनी सडकवर जावून कोण चांगले, कोण वाईट, जितके मिळाले सगळ्यांना एकत्र केले आणि घेऊन आले; लग्नाचे घर पाहुण्यांनी भरून गेले.

नंतर  राजा पाहुण्यांना पाहण्यास आत आला, तेव्हा त्याने एका मनुष्याला पाहिले जो लग्नाचे कपडे घातलेला नव्हता. त्याने त्याला विचारले,  हे मित्रा, तू लग्नाचे कपडे न घालता येथे का आलास? त्याचे तोंड बंद होवून गेले तेव्हा राजा ने सेवकांना सांगीतले, याचे हात पाय बांधून त्याला बाहेर अंधारात टाकून द्या, तिथे रडणे आणी दात खाणे असते. कारण बोलावलेले भरपूर आहेत परंतु निवडलेले थोडेच आहेत;

म्हणून देवावर विश्वास करून त्याच्या आज्ञेप्रमाणे चालणे आवश्यक आहे. ह्यासाठी सतत प्रार्थना करणे गरजेचे आहे.

**मतय २२:१-१४**